पिंपरी चिंचवड महानगरपालिका
लेखा विभाग,
क्र.लेखा/ ९ /कावि/ १८३८ /१८
दिनांक :- ३१/१/२०१८

विषय :- भांडवली व महसूली कामांचे बील अदायगीबाबत.
संदर्भ :- १.परिपत्रक क्र.लेखा/९/कावि/६३२२/२०१७दि.२४/७/१७.
२.मा.आयुक्त यांचेकडील परिपत्रक
क्र.आ-कक्ष/कावि/१५८/२०१६ दि.६/१०/२०१६

**परिपत्रक,**

वरील विषयाबाबत या कार्यालयाचे संदर्भीय परिपत्रकाचे अवलोकन व्हावे. सदरहु परिपत्रकानुसार भांडवली व महसुली बीलांचे संदर्भात तपासणी सुची सर्व विभाग प्रमुखांना पाठविलेली आहे. त्यानुसार तपासणी करून तपासणी सुचीसह बीले लेखा विभागाकडे अदायगीसाठी पाठविणे अपेक्षित आहे. तथापि, अद्यापही तपासणी सुचीतील काही बाबींची पुर्तता न करताच बीले लेखा विभागाकडे पाठविली जातात.

१. तपासणी सुचीतील अ.क्र.२९ नुसार बीलासोबत नस्तीमध्ये संबधित कामाचे Payment schedule जोडलेले नसते. याबाबत मा.आयुक्त यांचेकडील संदर्भीय २ चे परिपत्रकान्वये यापुर्वीच सुचना दिलेल्या असून त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येते. निविदा र.रू.१० लाखाचे वरील प्रत्येक कामांसाठी धावत्या देयकांचे टप्पे व कामांचे वेळापत्रक या दोहोंची सांगड घालून तयार केलेले Payment schedule बीलासोबत नस्तीमध्ये जोडण्यात यावे, व नव्याने काढण्यात येणा-या निविदांच्या अटीशर्ती मध्येच याचा अंर्तभाव करावा.

२. कामाचा कारारनामा झाल्यानंतर कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी कामाचा विमा (Insurance) काढून म.न.पा.कडे सादर करणेबाबत ठेकेदारावर बंधन घालावे. तसा निविदा अटींमध्ये समावेशही करावा.

३. विकास कामे व देखभाल दुरुस्तीची कामे करताना, त्यासाठी वापरातील साहित्याची गुणवत्ता चाचणी करण्यासाठी निवड करण्यात येत असलेल्या बाबींची/साहित्यांची यादी निविदा प्रसिध्द करतानाच प्रकाशित करण्यात यावी. व सध्या चालू असलेल्या कामांचे बाबतीत अशी यादी बील नस्तीत समाविष्ठ करावी.

४.Change of site आहे/नाही. याबाबत स्पष्ट उल्लेख तपासणी सुचीत करण्यात यावा.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८

प्रति :- सर्व संबधित विभागप्रमुख.
प्रतिलिपी :- मा.आयुक्त
माहितीस्तव सादर.

Scanned by CamScanner